Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

# कै. विलासराव देशमुख यांचे राजकीय क्षेत्रातील योगदान

प्रा. अभिजित पाटील,
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, पुणे.

**प्रस्तावना :**

समाजिक, राजकीय क्षेत्रातील नेत्यांचे योगदान हे त्यांच्या कार्याचा भाग मानला जातो, असे असतानाही काही नेत्यांचे कार्य हे विशिष्ट परिस्थिती व क्षेत्रातील विशेष योगदानाचा आढावा घेतला पाहिजे अशा काही नेत्यांमध्ये कै. विलासराव देशमुख यांचा समावेश होतो. त्यांच्या सामाजिक कार्याबरोबरच सामाजिक कार्य महत्वाचे आहे. त्यांच्या राजकीय क्षेत्रातील योगदान पाहत असताना त्यांना लाभलेला कैटुंबिक वारसा, राजकीय वारसा, त्यांचे राजकीय कारकिर्दीतील विविध पदावरील कार्य इत्यादींचा विचार करणे आवश्यक ठरते.त्यांची राजकीय कारकीर्द ग्रामपंचायत सरपंच १५ वर्षे, शिवराज पाटील चाकूरकर यांच्यानंतर २५ वर्षे लातूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी त्यासोबतच जवळपास १० वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दुहेरी भूमिका विलासरावांनी बजावली आहे. या कालावधीतील त्यांचे राजकीय कार्याचा स्थानिक पातळी, राज्य पातळी व केंद्र पातळीवरील कार्य अशा तीन पातळ्या पहावयास मिळतात. या प्रत्येक पातळीवरील त्यांच्या कार्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे.

विलासराव देशमुख यांचा जन्म २६ मे १९४५रोजी झाला. पिढीजात वडिलोपार्जित देशमुखी असलेल्या घराण्यात त्यांचे बालपण गेले असल्यामुळे त्यांना राजकारणाचे बाळकडू लाभले होते. विलासराव यांचे वडील दगडोजीराव हे बाभळगाव ग्रामपंचायतीत सरपंच पदी जवळपास १५ वर्षे होते, ते कॉंग्रेस पक्षात होते. हा वारसा विलासरावांनी पुढे चालू ठेवला. विलासराव देशमुख यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी उस्मानाबाद युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून शिवराज पाटील चाकूरकरांच्या नेतृत्वाखाली राजकारणात सक्रीय सहभाग घेण्यास सुरुवात केली. त्यनंतर (इसवबा) युवक कॉंग्रेसचे चिटणीस झाले. १९७४मध्ये बाभळगाव ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून येत तेथे सरपंच पदाचा कार्यभार साम्भालात आपल्या यशस्वी राजकारणाची वाटचाल सुरु ठेवली. सहा महिन्यांनीच जि. प. निवडणुकात त्याना यश मिळाले, तसेच पंचायत समिती उपसभापतीपद त्यांनी भूषवले. १९८० विधानसभा निवडणुकांत शिवराज पाटील यांच्या आग्रहाने भाग घेत त्यांनी विजय मिळवला, ते पुढे १९८५, १९९०, १९९९,२००४ या निवडणुकांत १९९५ चा पराभव वगळता लातूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व ५ वेळेस केले. या दरम्यान त्यांनी १९९९ ते २००३ व २००४ ते डिसेंबर २००८ जवळपास ८ ते ९ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. तत्पूर्वी भोसले मंत्रिमंडळात राज्यमंत्री पद त्याना मिळाले होते. २००८ नंतर मे २००९ मध्ये केंद्रीय अवजड उद्योग खाते विलासरावांना मिळाले, २०११ ग्रामविकास व पंचायतराज हे खाते त्यांना मिळाले. विज्ञान व तंत्रज्ञान खाते त्यांनी फेब्रुवारी २०१२ मृत्यूपर्यंत सभाळले होते. या त्यांच्या प्रदीर्घ वाटचालीतून त्यांनी राजकीय क्षेत्रात दिलेले योगदान महत्वाचे आहे.

**अ) स्थानिक पातळीवरील योगदान**

विलासराव आपले विधीचे शिक्षण पूर्ण करून लातूरला परतल्यानंतर त्यांनी वकिली करण्यास प्रारंभ केला. त्यवेळेस कॉँग्रेसी विचारसरणीचे काही तरुण गुळ मार्केट तसेच रामगोपालजी राठी यांच्या निवासस्थानासमोर बसून चर्चा करत असत, यामध्ये कै.नामदेवराव पाटील, ंक. हिप्परकर, टी जी भोसले इत्यादी मंडळींचा समावेश होता, यांना विलासराव सामीला झाले. या टीमचे नेते होते शिवराज पाटील चाकूरकर, त्यांच्या नेतृत्वाखाली विलासराव ब्लौक युवक कॉंग्रेसचे चिटणीस झाले. येथून त्यांच्या राजकारणाची सुरुवात झाली. १९७२ साली लातूर जिल्ह्याच्या दुष्काळ निवारण समितीचे सचिव म्हणून काम केले. त्यानंतर जिल्हा युवक कॉंग्रेस अध्यक्ष म्हणून काम केले.

१९७४मध्ये बाभळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच सरपंच बनले. त्यानंतर जिल्हा परिषदेत यश मिळवत ते पंचायत समितीच्या उपसभापती पदी विराजमान झाले. १९७८ साली इंदिरा गांधींची जाहीर सभा जिल्ह्यात आयोजित करण्यात आली या सभेचे संपूर्ण जबाबदारी स्विकारत ही सभा पूर्ण यशस्वी करून दाखविण्याचे त्यांनी आपले सामर्थ्य दर्शन जिल्ह्यास दाखवीले. त्यांच्या वक्तृत्व शैलीचा विकास याच कालवधीत झाला.

**आ) राज्यपातळीवरील योगदान**

१९८० ते २००८ या प्रदिर्घ कालावधीत विलासराव देशमुख यांनी राज्य पातळीवर विविध पदांवर काम केले. दोनच वर्षात आपली वेगळी ओळख त्यांनी विधानसभेत निर्माण केली होती. विधानसभेची कार्यपद्धती थोड्याच दिवसांत त्यांनी आत्मसात केली. प्रश्न विचारणे लक्षवेधी सूचना दाखल करणे, ठराव मांडणे इत्यादी संसदीय आयुधांचा पुरेपूर वापर त्यांनी केला यातून त्यांच्या नेतृत्वाची चुणूक महाराष्ट्राला दाखवण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यवेळी त्यांनी ‘लातूर– मिरज न्यारोगेजचे रुपांतर ब्रॉडगेज मध्ये करण्याचा ठराव मांडला व त्याचा पाठपुरावा सतत चालू ठेवला. यामधून ते प्रभावी आमदार आहेत अशी छाप सभागृहात व बाहेर निर्माण झाली.

१९८२ मध्ये भोसले मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांना स्थान मिळाले. कृषी, ग्रामविकास, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या खात्यांचा राज्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला. १९८३ मध्ये वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात गृह व सर्वसामान्य प्रशासनाचे राज्यमंत्री पद मिळाले. यादरम्यानच्या काळात १९८२मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून उस्मानाबाद व लातूर असे दोन स्वतंत्र जिल्ह्ये निर्माण झाले. या कार्यात विलासरावांचे सिंहाचा वाटा होता. १९८५पर्यंत ते राज्यमंत्री पदावर होते.

पुढे निलंगेकर यांच्या नंतर शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले, त्यांच्या मंत्रिमंडळात महसूल, सहकार, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक व संसदीय कामकाज या खात्यांचे कॅबिनेट मंत्रीपद

विलासरावांकडे देण्यात आले. त्यांच्या राजकीय सुवर्णकाळास या काळात सुरुवात झाली. मांजरा सहकारी साखर कारखाना त्यांनी उभारला. अंबा कारखाना, किल्लारी कारखाना, तेरणा कारखाना आणि नळेगाव कारखाना हे साखर कारखाने लातूरच्या चारही बाजूस असताना मांजरा साखर कारखाना काढण्याचे धाडस दाखवले, यातून विलासरावांनी सहकारच्या माध्यमातून साखर कारखानदारी क्षेत्रातील प्रगतीचे अनेक विक्रम प्रस्थपित केले. त्याचबरोबर लातूर शहरात विखुरलेले शासकीय विभाग एकाच ठिकाणी आनण्यासाठी कोटी रुपये खर्चून जिल्हा परिषदेच्या तीन मजली प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. तसेच आदर्शवत पोलीस मुख्यालयाची योजना कार्यान्वित करण्यात आली. तसेच कृषिमंत्री असताना मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत लातूरमध्ये कृषी महाविद्यालय व उद्गीर या ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाची सुरुवात केली. लातूरच्या साई या ठिकाणी पर्यटन केंद्राची स्थापना केली. तसेच लातूर जिल्हा पशुसंवर्धन चिकित्सालयाची भव्य इमारत उभी करण्यात त्यांचे मोठे योगदान होते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांच्या पहिल्या टर्म कालवधीत काही महत्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाला स्वायत्तता, आर्थिक आपत्तीमधून मार्ग काढण्याकरिता प्रशासकीय खर्चामध्ये कपात करून प्रशासनाला गतिमान केले, कराचा बोजा न वाढविता महसुलात लक्षणीय वाढ, गरिबांसाठी वर्षाला २५ हजार घरे बांधली, २५ लाख घरांची धडक योजना आखली, राज्य अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना, पहिलीपासून इंग्रजी विषय सुरु करणे, जैवतंत्रज्ञान धोरणाची प्रभावी अमलबजावणी, महिलांचे सामजिक स्थान उंचावण्यासाठीचे निर्णय इत्यादींचा समावेश उल्लेख महत्वाचा आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांच्या दुसऱ्या टर्म कालवधीत काही महत्वाचे निर्णय घेतले, यामध्ये वस्त्रोद्योग धोरण, मोनोरेल सेवा, निर्मल ग्राम योजनेची उल्लेखनीय कामगिरी, ४५ लाख शेतकऱ्यांना ८३४४ कोटी रुपये कर्जमाफी, मुंबई– नांदेड– लातूर विमानसेवा, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर, कोल्हापूर, अकोला यांत नवे वैद्यकीय महविद्यालये, स्वातंत्रसैनिकांच्या निवृत्ती वेतनात २००० रु. वाढ, प्रत्येक जिल्ह्यात पर्यटन विभाग व केटरिंग कॉलेज, दलित व आदिवासी यांसाठी अर्थसंकल्पात सर्वाधिक तरतुद करणारा निर्णय या निर्णयांत कै.विलासराव देशमुख यांचे मोलाचे योगदान होते.

**इ) राष्ट्रीय पातळीवरील योगदान**

मे २००६ मध्ये संसदेच्या कोणत्याही सभागृहाचे सभासद नसताना विलासराव केंद्रीय मंत्रिमंडळात अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम खात्याचे मंत्री म्हणून कार्यरत झाले. या मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या कंपन्यांची वर्गवारी करून या कंपन्यांना महारत्न, नवरत्न व मिनीरत्न अशा तीन भागामध्ये विभाजित केले. लातूरसाठी ६०००कोटी रुपयांचा १६०० मेगावॅट

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

वीजनिर्मितीचा प्रकल्प मंजूर करून घेतला. ग्राम विकास मंत्रालयाच्या विविध योजनांसाठी ७४००० कोटी रुपयांची तरतुद करून घेतली.

अशाप्रकारे विलासराव देशमुख यांनी आपल्या कार्यकालामध्ये विविध योजना राज्य पातळीवर राबविल्या यापैंकी काही योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य म्हणून नावारूपास आले. तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छतेच्या योजनांचा प्रथम क्रमांकाचे पुरस्कार महाराष्ट्राला मिळाले. तसेच केंद्रात काम करत असताना त्यांनी नवनवे उपक्रम सुरु करण्याचे प्रभावी प्रयत्न केले. यामधून कै. विलासराव देशमुखांची प्रतिमा प्रभावी आमदार, कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री, समयसूचक नेता, दूरदृष्टी असणारा नेता अशी होती. या कर्तव्यदक्ष नेत्याच्या कार्याचा व राजकीय योगदान वरीलप्रमाणे नोंदवता येते.

**संदर्भ**

१) खेकाळे मंगेश, १९९९, 'राजकीय नेतृत्व', नागपूर, मंगेश प्रकाशन,
२) मोरे सुदर्शन, १९९, 'श्री विलासराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन', अमरावती विद्यापीठास सादर केलेला एम.फिल. लघु शोधप्रबंध(अप्रकाशित).
३) पाटील कपिल संपा., २००१, 'देश–मुखी', मुंबई, लोकमुद्रा प्रकाशन.
४) अभ्यंकर वा.रा. १९९६, 'नेतृत्वाचे पैलू', पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन.
५) पळशीकर सुहास, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', पुणे, सुगावा प्रकाशन.
६) पळशीकर सुहास, २००१, 'राजकीय पक्ष पर्यायाविना चाललेली स्पर्धा', पुणे, साधना दिवाळी अंक.
७) पळशीकर सुहास, १९९१, 'भारतीय राजकारणाची प्रक्रिया', नाशिक, य. म. मु. वि. नाशिक प्रकाशन.
८) डोळे ना.य., 'राजकीय पक्षांचे बदलते अंतरंग', पुणे, साधना दिवाळी अंक .
९) फडके य.दि., 'लोकसभा निवडणूक १९५१ ते १९९९', मुंबई, अक्षर प्रकाशन.
१०) पवार निंबाजीराव, १९९८, 'शरद पवाररू भाग एक', नाशिक.
११) दर्शनकार अर्जुनराव, १९९२, 'पंचायत राज आणि नागरी प्रशासन', औरंगाबाद, कैलास प्रकाशन.
१२) पाथ्रीकर रामकृष्ण, १९९८, 'विकास रत्न' , लातूर, लातूर विशेषांक.
१३) Pandey B.N.( 1977) 'Leadership in South Asia' New Delhi, Vikas Publishing House.
१४) प्रधान राम, १९९०, 'वाटचाल लातूर जिल्ह्याच्या विकासाची', लातूर, खाजगी प्रकाशन.
१५) जैन अशोक , १९९८, 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', मुंबई, शेठ पब्लिशर्स प्रा. लि.